जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी)
( महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग पुरस्कृत स्वायत्त संस्था )
पत्रपेटीक्र.५०४ ,कांचनवाडी,पैठणरोड
छत्रपती संभाजीनगर - ४३१००५,महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी: 0240-2379159-61
फॅक्स :0240-2379036

Website : www.walmi.org
E-mail:admn@walmi.org

जा.क्रं.वाल्मी/प्रशासन/हिरकणी कक्ष/ 509 /२०२६ दिनांक: 30 /07 /२०२६

# सीलबंद दरपत्रक (Quotations) मागणी नोटीस
## (अंदाजपत्रक तयार करण्यासाठी )

जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत महिला कर्मचारी आणि येणाऱ्या अभ्यागतांच्या सुविधेसाठी संस्थेच्या आवारात **'हिरकणी कक्ष'** स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या कक्षाच्या उभारणीसाठी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या, चालू शासकीय दरसूचीत (Non-SSR Items) समाविष्ट नसलेल्या विविध साहित्याची खरेदी करावयाची आहे.

त्याकरिता खुल्या बाजारातील अधिकृत, नामांकित पुरवठादार किंवा संबंधित एजन्सीजकडून स्पर्धात्मक व सीलबंद दरपत्रके **(Sealed Quotations)** मागविण्यात येत आहेत. इच्छुक पुरवठादारांनी आपली अधिकृत दरपत्रके विहित मुदतीत कार्यालयाकडे सादर करावीत.

### 1. खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशील:

| अ.क्र. | साहित्याचे नाव व तांत्रिक तपशील | प्रमाण / नग | दर (प्रति नग/युनिट रु. सर्व करांसह) |
|---|---|---|---|
| 1 | पाळणा (Cradle for baby): मजबूत धातूचा किंवा लाकडी, सुरक्षित लॉक आणि गादीसह उत्तम दर्जाचा. | 1 नग | |
| 2 | डस्टबीन (Dustbin): पॅडल ऑपरेटिंग (Foot Pedal), प्लास्टिक किंवा स्टेनलेस स्टील, मध्यम आकार. | 2 नग | |
| 3 | लहान मुलांची खेळणी (Toys for baby): सुरक्षित, नॉन-टॉक्सिक प्लास्टिक साहित्य, मऊ खेळणी (Soft Toys) व शैक्षणिक खेळणी संच. | 1 संच (Set) | |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | Single size foam mattress (गादी ) | 2 नग | |
| 5 | Standard size pillow (उशी ) | 2 नग | |
| 6 | Cotton single bed sheet with pillow cover (कॉटन बेड शिट व उशिचे कव्हर ) | 4 नग | |

## 2. अटी व शर्ती (Terms & Conditions):

१. इच्छुक पुरवठादारांनी आपले दरपत्रक एका सीलबंद लिफाफ्यात सादर करावे. लिफाफ्यावर स्पष्ट अक्षरात "हिरकणी कक्ष साहित्यासाठी दरपत्रक" असा उल्लेख असावा.

२. दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व करांसह (GST, वाहतूक खर्च व इतर शुल्कांसह) वाल्मी संस्था, छत्रपती संभाजीनगर येथील जागेवर पुरवठा करण्याच्या अटीवर असावेत.

३. सीलबंद दरपत्रके दिनांक 10 / 08 /2026 रोजी दुपारी 3:00 वाजेपर्यंत वाल्मी कार्यालयातील आवक-जावक विभागात स्वीकारली जातील.

४. प्राप्त झालेली दरपत्रके तांत्रिक निकषांवर तपासून, दराच्या बाबतीत जे दर सर्वात कमी (L-१) असतील, ते अंतिम करण्यात येतील.

५. पुरवठादार एजन्सीकडे वैध GST नोंदणी प्रमाणपत्र आणि पॅन कार्ड (PAN Card) असणे बंधनकारक आहे, त्याची प्रत दरपत्रकासोबत जोडावी.

६. कोणतेही कारण न देता प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकृत किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याकडे राखून ठेवण्यात आला आहे.

७. बाजारभाव दरपत्रक हे केवळ अंदाजपत्रक तयार करण्यासाठी मागवण्यात येत आहे. यावरून कंत्राट किंवा काम दिलेच जाईल याची कोणतीही हमी दिली जात नाही.

**प्रशासकीय अधिकारी**
**वाल्मी,छत्रपती संभाजीनगर.**

**प्रत:-**

१. **प्रशासन विभाग, वाल्मी छत्रपती संभाजीनगर यांचे नोटीस बोर्ड.**

२. **मालमत्ता व्यवस्थापन उपविभाग, वाल्मी छत्रपती संभाजीनगर यांचे नोटीस बोर्ड.**

३. **वाल्मी वेबसाईट .**